# फौ.प्र.सं.कलम २०० अन्वये फिर्यादी व साक्षीदारांचा जबाब

**फौ.कि.अर्ज नंबर २५/२०२५**

**निशाणी ७**

फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा जबाब

मी शपथेवर निवेदन करतो कि,

नाव :– ज्ञानोबा किशनराव बडे

वय :– ६४ वर्षे, व्यवसाय :– निवृत्त

राहणार :– लातुर, ता. जि.लातुर.

DNYANESHWAR MADHUKAR GITTE

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2025.09.20 13:27:00 +0530

०१. मला दोन मुली नामे पुजा व कल्याणी या आहेत. मी माझ्या दोन्ही मुलीच्या नावे बक्षीसपत्र करुन दिले आहे. कल्याणी हिच्या नावे पाच एकर जमीन करुन दिली आहे. तिच्या नावे फेर झाला असुन ति जमीन तिच्या नावे झाली. पुजा हिच्या नावे १ एकर जमीनीवर फेर चढवीण्यात आला. परंतु चुकिचे क्षेत्र टाकल्यामुळे बाकिच्या चार एकरसाठी मंडळ अधीकारी यांनी त्यांचे नाव लावता येणार नाही असे सांगीतले. त्यामध्ये दोन ते चार महिन गेले. तलाठी यांनी चुकीचे क्षेत्र कसे पडले असे म्हणुन त्यामध्ये दोन चार महिने गेले. त्यांनी बरोबर क्षेत्र करुन दिनांक १८/१०/२०२४ रोजी सातबारा मिळेल असे सांगीतले. त्यानंतर मी त्यांच्याकडे गेलो असता तलाठयांनी माझ्या भावाने तक्रार दिल्याचे सांगीतले. मी त्यांच्याकडे तक्रारबाबत विचारण केली असता त्यांनी वरती तक्रार दिल्याचे सांगीतले. त्यानंतर मी वरीत येउन काळे यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी तक्रार दाखवीली नाही. त्यानंतर दिनांक २७ रोजी तलाठयांनी लेखी तक्रार त्यांच्याकडे प्राप्त झाल्याचे लेखी पत्र दिले होते. त्यानंतर मी तहसीलदार यांच्याकडे आलो. वडीलोपार्जीत जमीन आहे असे म्हणुन तहसीलदार यांनी सांगीतले. त्यानंतर मी त्यांना माझी स्वताची खरेदीची

जमीन असल्याचे सांगीतले. तहसीलदार यांनी मला त्याचे खरेदीखत दाखवीण्यास सांगीतले. त्यामुळे मी त्यांना खरेदीखत दाखवीले. त्यांनी मला फेरफार होउन जाईल असे सांगीतले. परंतु त्यांनी फेरफारवर कोणताही निकाल दिला नाही. वकिल पडोळे यांनी मला दहा हजार रुपये दयावे लागतील नाहितर निकाल विरुद्ध लागेल असे सांगीतले. वकिलांनी मला तहसीलदार यांना दहा हजार रुपये दयावे लागतील असे सांगीतले. मी त्यांना माझ्या निवृत्तीवेतनावर जमीन घेतली आहे मी कुठुन पैसे देउ असे सांगीतले. मी तहसीलदार यांना तुम्ही निकाल का लावत नाही याची विचारण केली असता त्यांनी मला तुमचे न्यायालयात प्रकरण चालु आहे असे सांगीतले. मी त्यांना न्यायालयाने तुम्हाला काही दिले आहे का असे विचारले. त्यांनी मला पुढचे का विचारता असे म्हणले. मी त्यांना तुम्ही माझ्या विरुद्ध निकाल दया परंतु निकाल दया असे म्हणलो. तहसीलदार यांनी मला ठिक आहे मी निकाल दोन चार दिवसात देईल असे म्हणले. दोन चार दिवसांनी त्यांनी विरुद्ध निकाल दिला. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला तक्रार दिली. तेथुन मी त्याची पोहोच घेतली. याव्यतीरीक्त मला काही सांगायचे नाही.

साक्षीदाराची सही

......................

समक्ष

DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2025.09.20 13:27:06 +0530

रेणापुर (ज्ञा.म.गित्ते)

दिनांक : – १०/०७/२०२५ १ले न्यायदंडाधीकारी प्रथम वर्ग,

रेणापुर